NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## महा मेट्रो-केंद्रीय संचार ब्युरो-मनपा के संयुक्त विद्यमानाने मल्टिमीडिया प्रदर्शनचे उदघाटन

## हर घर तिरंगा, आजादी का अमृत महोत्सव,विभाजन विभीषिका स्मृती दिवस निमित्त सिताबर्डी इंटरचेंज येथे प्रदर्शन

## १३ - १५ ऑगस्ट पर्यंत प्रदर्शन सर्वासाठी खुली




नागपुर: संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या द्वारे सिताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्टेशनवर विभाजन विभीषिका स्मृती दिवस मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनीचे आयोजन

करण्यात आले आहे. केंद्रीय संचार ब्युरो नागपूर कार्यालय, महा मेट्रो नागपूर आणि नागपूर महानगरपालिका यांचा या उपक्रमाच्या आयोजनासाठी संयुक्तपणे सहभाग आहे. या तीन दिवसीय प्रदर्शनीचे उदघाटन मनपा आयुक्त श्री. अभिजित चौधरी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.

उल्लेखनीय आहे कि, भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मागील २ वर्षांपासून या प्रदर्शनीचे आयोजन केले जात आहे. या छायाचित्र प्रदर्शनाला मोठ्या संख्येने नागरिकांचा प्रतिसाद मिळाला होता, यावर्षी आजपासून सुरु झालेली ही ३ दिवसीय छायाचित्र प्रदर्शनी १५ ऑगस्टपर्यंत नागरिकांकरिता सुरु राहणार आहे.

उद्घाटन प्रसंगी श्री चौधरी यांनी सांगितले की, देश विभाजित झाला त्या वेळी झालेली विभीषिका ही भारतीय माणसांकरिता हृदयावर कोरलेली जखम आहे. हे धगधगते वास्तव आजच्या पिढीला माहिती होणे गरजेचे आहे. ज्या माध्यमाने स्वातंत्र्यासाठी दिलेल्या अनेक क्रांतिकारी आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाचे महत्व अबाधित ठेवता येईल. या स्वातंत्र्याला जबाबदारीने सांभाळण्याची जबाबदारी आता तरुण पिढीकडे हस्तांतरित होणार आहे. तसेच विशेष अतिथी म्हणून उपस्थित महामेट्रोचे महाप्रबंधक श्री सुधाकर उराडे यांनी त्यांच्या मनोगतात राष्ट्रीय सण देखील इतर मोठ्या सनासारखे साजरे करायला पाहिजे, गांवांमध्ये हे दिवस मोठ्या सणासारखेच साजरे केल्या जातात. ते वातावरण देशसेवेसाठी प्रेरणा देणारे असते.

यावेळी नागपूर महानगरपालिका शाळेच्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी,सुभाषचंद्र बोस, झाशी राणी, सावित्रीबाई फुले, माँ जिजाऊ यांच्या वेशभूषा करून त्या त्या महान पुरुषांच्या घोषवाक्यांसह अभिनय केला. याप्रसंगी मनपाच्या शिक्षणाधिकारी साधना सैय्याम, प्रेस माहिती ब्युरो कार्यालयाचे उपनिदेशक शशिन् राय, केंद्रीय संचार ब्यूरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी सौरभ खेकडे प्रामुख्याने उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौरभ खेकडे यांनी केले तर संचालन मनपाचे जनसंपर्क अधिकारी मनिष सोनी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगान म्हणून उपस्थितांनी हर घर तिरंगाची शपथ घेतली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शशिन् राय यांनी केले.


आजादी का अमृत महोत्सव
विभाजन विभीषिका स्मृति दिवस #HarGharTiranga
मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शनी 2024



